


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३२६, शुक्रवार २० सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# लंके यांच्या संकल्पनेतील आरोग्य यज्ञाला प्रारंभ

## ब्रेस्ट कॅन्सर आणि रक्तदान शिबिराला प्रतिसाद



■ राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या आरोगय यज्ञास कर्जुले हर्या व पोखरी येथे प्रारंभ करण्यात आला.

कर्जुले हर्या : प्रतिनिधी

**जिल्हा परिषदेच्या मा. सदस्या राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ब्रेस्ट कॅन्सर आणि रक्तदार शिबिरास कर्जुलेहर्या व पोखरी येथे मोठया उत्साहात प्रारंभ झाला. दि.१९ ते २९ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य यज्ञामध्ये महिलांचा ब्रेस्ट कॅन्सर आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

कर्जुले हर्या येथे कर्जुले हर्या, सावरगांव, नांदुरपठार, पिंपळगांव रोठा, कारेगांव व कासारे येथील गावे तर पोखरी येथे पोखरी, देसवडे, म्हसोबा झाप, वारणवाडी, पळसपुर, काताळवेढा येथील शिबिरात महिला तसेच पुरूषांनी सहभाग नोंदविला. कर्जुले हर्या व पोखरी येथे शिबिरांना प्रारंभ झाल्यानंतर राणीताई लंके यांनी दोन्ही ठिकाणी भेटी देऊन महिला तसेच रक्तदात्यांची भेट घेऊ विचारपुस केली. दुपारच्या वेळी खा. नीलेश लंके यांनीही दोन्ही ठिकाणी भेटी देऊन माहीती घेतली. दोन्ही ठिकाणी रक्तदाते तसेच तपासणी करणाऱ्या महिलांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

दि. २९ सप्टेंबर पर्यंत सुरू राहणाऱ्या या शिबिरांचे नियोजन नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या सभासदांनी केले असून जास्तीत जास्त महिलांना या शिबिराचा लाभ व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

यावेळी दिपक लंके, बाजार समितीचे सभापती बाबाजी तरटे, उपसभापती बापूसाहेब शिर्के, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, डॉ. बाळासाहेब कावरे, सुवर्णा धाडगे, रा. या. औटी, मोहनराव रोकडे, ॲड. राहुल झावरे, संदीप चौधरी, महेंद्र गायकवाड, चंद्रभान ठुबे, डॉ. दीपक आहेर, लकी कळमकर, रविंद्र राजदेव, अशोक आंधळे, बबन आंधळे, शशीकांत आंधळे, दत्ता येवले, पर्वती चिकणे, बापू ठुबे, शंकर कासुटे, मंगेश आंधळे, मनोज शिंदे, राजेंद्र तराळ, छाया कोकाटे, स्वाती उंडे, भागुजी झावरे, बबलू झावरे, किरण तराळ, प्रसाद नवले, अमोल उगले, दत्तात्रय साळुंके, बाबू आंधळे, सतीश पवार, बाळासाहेब शिंदे, जयराम आहेर, पांडूरंग आहेर, नवनाथ मोरे, धनंजय गुंजाळ, अविनाश मोरे, भाऊसाहेब कोकाटे, संजय काशीद, भाऊ चौधरी आदी उपस्थित होते.

### ब्रेस्ट कॅन्सरसाठी जनजागृती हवी

ग्रामीण महिलांमध्ये ब्रेस्ट कॅन्सरचे प्रमाण मोठया प्रमाणावर आढळत असून त्यावर मात करणे ही काळाची गरज आहे. त्याच हेतूने या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून प्रतिष्ठाणचे पदाधिकारी, सभासद यांनी जास्तीत जास्त महिलांना या शिबिराचा लाभ कसा होईल याची काळजी घ्यावी. रक्तदात्यांनाही रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहीत करावे.

**राणीताई नीलेश लंके**
मा. सदस्य, जिल्हा परिषद, नगर

### स्तुत्य उपक्रम

राणी लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने हाती घेण्यात आलेला हा उपक्रम स्तुत्य आहे. महिलांमधील ब्रेस्ट कॅन्सरचे प्रमाण चिंताजनक आहे. त्यावर मात करण्यासाठी गावागावातील महिलांसाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले असून त्याचा लाभ प्रत्येक महिलेस मिळाला पाहिजे. रक्तदान शिबिरात तरूणांनी सहभागी होउन रक्ताच्या दानाबरोबरच विमा कवचाचाही लाभ घ्यावा.

**नीलेश लंके**
खासदार

### राणीताईवर आधारीत गाण्याचे लॉन्चिंग

पुणेवाडी गावचे सरपंच आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मारुती रेपाळे यांचे चिरंजीव सौरभशेठ रेपाळे आणि संकेत साळुंके यांनी भावी आमदार राणीताई लंके यांच्यावर काढलेल्या गाण्याचा आज लोकनेते खासदार निलेश लंके साहेब आणि राणीताई लंके यांच्या शुभारंभ संपन्न झाला .यावेळी दोघांचाही सन्मान खासदार निलेश लंके यांच्या हस्ते करण्यात आला.

### पाच लाखांचा विमा

या शिबिरात रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास पाच लाखांचे विमा कवच मिळणार आहे. त्यात दोन लाखांचा अपघाती विमा, ३ लाखांचा जीवन विमा, रक्तदात्यास व त्याच्या नातेवाईकास १ वर्षे मोफत रक्त मिळणार आहे.

# कर्जमाफी व पाण्याच्या प्रश्नावर भुमिपूत्रांचा एल्गार

## ■ २४ सप्टेंबरपासून आमरण उपोषण ■ संतोष वाडेकर यांची माहिती

पारनेर : प्रतिनिधी

**सरसकट कर्जमाफी व पाण्याच्या प्रश्नावर भुमिपूत्र शेतकरी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली असून मागण्यांची तड लावण्यासाठी संघटनेचे पदाधिकारी तसेच सदस्य येत्या २४ सप्टेंबरपासून आमरण उपोषणाचे अस्त्र उगारणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी दिली.**



■ सरसकट कर्जमाफी व पाण्याच्या प्रश्नावर भुमिपूत्र शेतकरी संघटनेच्या वतीने अमरण उपोषण करण्यात येणार असून त्यासंदर्भातील निवेदन उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना सादर करण्यात आले.

पश्चिम वाहिन्यांचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी वळवून नगर जिल्हयातील दुष्काळी भगाला देण्यात यावे, कान्हूरपठार, पुणेवाडी, जातेगांव, राळेगणसिध्दी, शहाजापुर उपसा सिंचन योजनेला मान्यता देऊन कार्यान्वीत कराव्यात, डिंबे माणिकडोह बोगद्याचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे, अटी, शर्ती न लावता शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती द्या, नियमित कर्जदारांना प्रोत्साहनपर देण्यात येणारे ५० हजारांचे अनुदान ठराविक शेतकऱ्यांना मिळाले, उर्वरीत शेतकऱ्यांना ते मिळावे.

संतोष वाडेकर यांनी सांगितले की, कुकडी या संयुक्त प्रकल्पाची निर्मिती पुणे, नगर व सोलापूर जिल्हयातील कायमस्वरूपी दुष्काळी असलेल्या भागातील सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी करण्यात आली होती. प्रकल्प पुर्ण होऊन पुणे जिल्हा वगळता पारनेर, श्रीगोंदे, नगर तालुक्यातील काही भाग काही अंशी ओलिताखाली आला. ९० टक्के शेती आजही कायमस्वरूपी दुष्काळाच्या छायेखाली आहे. पारनेर-नगर तालुका हा अत्यंत दुष्काळी प्रदेशात असून पर्जन्यमान कमी आहे. दुष्काळग्रस्त गावांना दरवर्षी टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागतो. त्यासाठी शासनाचा मोठा खर्च होतो. पठार भागातील सुपीक जमीन केवळ सिंचनाअभवी कोरडवाहून आहे. शेतकरी, बेरोजगारांना उपजिवेकेसाठी स्थलांतर करावे लागत असल्याचे वाडेकर यांनी सांगितले.

संघटनेच्या वतीने अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या आंदोलनासंदर्भात उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख अशोक आंधळे, जिल्हा संपर्क प्रमुख राम वाडेकर, जिल्हा उपाध्यक्ष रावसाहेब झांबरे, प्रविण खोडदे, तालुका कार्याध्यक्ष संजय भोर, आदी उपस्थित होते.

### योजनांना मान्यता द्या

कुकडी प्रकल्पाच्या १९६६ च्या प्रशासकीय मान्यतेमध्ये या दुष्काळी भागासाठी एक टीएमसी पाण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. मात्र अद्यापपर्यंत पाण्यावाचून पारनेर, नगर, श्रीगोंद्याचा बराचसा भाग वंचित राहीलेला आहे. कान्हूरपठार, पुणेवाडी, जातेगांव, राळेगणसिध्दी, शहांजापुर या उपसा सिंचन योजनांची शासन दरबारी नोंद असल्याने या योजनांना मान्यता देउन त्या कार्यान्वीत कराव्यात व शेतकऱ्यांना न्याय द्यावा.

**संतोष वाडेकर**

### तर महाराष्ट्र दुष्काळमुक्त होईल

सध्याचे वाढलेले सिंचन, वाढती कारखानदारी आणि उपलब्ध पाणी यात खूपच तफावत आहे. पाण्यासाठी होणार संघर्ष पाहता त्यावर उपाययोजना गरजेच्या आहेत. पश्चिमेकडून घाट माथ्यावर पर्जन्याचे प्रमाण भरपूर आहे. साठवण क्षमता कमी असल्याने सुमारे ६०० ते ८०० टीएमसी पाणी कोकणामध्ये वाहून जाते. हे वाहून जाणारे पाणी वळवून दुष्काळी भागास देण्यात आलेतर संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळमुक्त होऊ शकतो असा विश्वास वाडेकर यांनी व्यक्त केला.

### सरसकट कर्जमाफी द्या

शासनाच्या आयात निर्यातीच्या चुकीच्या धोरणामुळे तसेच पावसाची अनियमितता, अतिवृष्टी, खते, औषधे, बी बीयाणे, यांचे वाढलेले दर आणि शेतीतून मिळणारे उत्पन्न याची बेरीज-वजाबाकी केल्यास हाती काही शिल्लक राहत नाही. परिणामी शेतकरी कर्जबाजारी होतो. त्यावर उपाय म्हणून दोनदा शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली. अटी व शर्तीमुळे निम्म्याहून अधिक शेतकरी या योजनेपासून वंचित राहिलेले आहे. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रूपये देण्याचा निर्णय घेण्यात आला असला तरी अनेक शेतकरी या योजनेपासूनप वंचित आहेत. त्यासाठी अटी व शर्ती न लावता सरसकट कर्जमुक्ती करण्याचे धोरण घेण्याची आग्रही मागणी भुमिपुत्र संघटनेची असल्याचे वाडेकर म्हणाले.

# काँग्रेसचाच मुख्यमंत्री होणार : आ.थोरात

## महाविकास आघाडीत चर्चांना उधाण



मुंबई : प्रतिनिधी

**काँग्रेसचे नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत मोठं विधान केले आहे. "महाविकास आघाडीचा काँग्रेसचा मुख्यमंत्री होईल", असे बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे महाविकास आघाडीत चर्चांना उधाण आले आहे.**

विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याची मागणी शिवसेना ठाकरे गटाने अनेकदा केली आहे. मात्र, याबाबत अद्याप महाविकास आघाडीतील नेत्यांनी काहीही निर्णय घेतलेला नाही. काही दिवसांपूर्वी मुंबईत षण्मुखानंद सभागृहात महाविकास आघाडीचा मेळावा पार पडला होता. त्या मेळाव्यात बोलतानाउद्धव ठाकरेयांनी राष्ट्रवादीकाँग्रेसशरद पवार गटाला आणि काँग्रेसला आवाहन करत मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा, मी पाठींबा देतो, असं म्हटलं होतं. दरम्यान, यानंतर आता काँग्रेसचे नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत मोठं विधान केलं आहे. राज्यात विधानसभेची निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे घडामोडींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. राज्यभरात वेगवेगळ्या मतदारसंघात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांच्या सभा, मेळावे आणि आढावा बैठका सुरु आहेत. या सभांच्या माध्यमातून एकप्रकारे निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केल्याचं चित्र दिसून येत आहे. अनेक उर्वरीत पान ३ वर

# मुख्यमंत्र्यांचा लाडकी बहीण कार्यक्रम उधळून लावू

## सोलापुरात सकल मराठा समाजाचा इशारा

सोलापूर: प्रतिनिधी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली २५ सप्टेंबर रोजी सोलापुरात लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. सोलापूर जिल्हा प्रशासन कार्यक्रमासाठी जय्यत तयारी करत आहे. मराठा समाजाला आरक्षणाची मागणी करत मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. जरांगे पाटील यांचे राज्यातील समर्थक हे राज्य सरकार विरोधात आक्रमक झाले आहेत.**

सोलापुरातील मराठा समाज बांधवानी माध्यमांसमोर प्रतिक्रिया देत, इशारा दिला आहे. सोलापुरात मुख्यमंत्र्यांचा लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम होऊ देणार नाही, मराठा समाज मुख्यमंत्र्यांचे कार्यक्रम उधळून लावणार अशी भूमिका सकल मराठा



समाजाच्या माऊली पवार यांनी मांडली आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मराठा बांधवांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे लाडक्या बहीण, लाडक्या भाऊच्या प्रचारासाठी २५ सप्टेंबर रोजी सोलापुरात येणार आहेत. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या विविध मागण्यांचं घोंगड भिजत ठेवून मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री प्रचार करत आहेत.

मराठा आरक्षणाचा हैदराबाद गॅजेट, सातारा गॅजेट, बॉम्बे गॅजेट लागू करण्याच निर्णय आजही प्रलंबित ठेवण्यात आला आहे, त्यामुळे सोलापुरात होणाऱ्या लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम उधळून लावू, अशी संतप्त प्रतिक्रिया सोलापुरात मराठा बांधवांनी दिली आहे.

सोलापूर जिल्ह्यात मराठा आरक्षण आणि धनगर आरक्षणाची मागणी जोर धरली आहे. पंढरपूर येथे धनगर समाजाने आठ दिवसांपासून एसटी प्रमाणपत्राची अंमलबजावणी करा अशी मागणी करत आमरण उपोषण सुरू केलं आहे. बार्शी येथे अपक्ष आमदार राजेंद्र राऊत हे मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारने विशेष अधिवेशन बोलवावं अशी मागणी करत आठ दिवसांपासून ठिय्या आंदोलन सुरू केलं आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा धनगर आरक्षण आणि मराठा आरक्षणाचं केंद्रबिंदू झाला आहे.



# चंदेरी

## ...म्हणून रविना टंडनने केले घटस्फोटिताशी लग्न!



बॉलीवूड अभिनेत्री रविना टंडन तिच्या काळातील एक आघाडीची अभिनेत्री होती. अभिनयाच्या बळावर तिने अनेक चित्रपट यशस्वी करून दाखवले. आजही ती बॉलिवूडमध्ये सक्रिय आहे. करिअरच्या शिखरावर असताना तिच्याकडे अनेक जाहिराती होत्या. जाहिरातींमधून सुद्धा तिने कोट्यवधी रुपयांची कमाई केली. अभिनेत्यांपासून तर चित्रपटसृष्टीची निगडित असलेल्या अनेकांचा रविनावर जीव जडला होता. मात्र असे असताना रविनाने एका घटस्फोटित उद्योगपतीशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. रविनाच्या या निर्णयाचे त्यावेळी अनेकांना आश्चर्य वाटले. मात्र गेल्या २२ वर्षांपासून दोघांचा सुखाचा संसार सुरू आहे. घटस्फोट, ब्रेकअप या गोष्टी बॉलिवूडला नवीन नाहीत. बॉलिवूडमध्ये कुणाचे नाते फार काळ टिकत नाही. मात्र असे असताना रविनाचा तिच्या पतीसोबतचा संसार अतिशय आनंदात सुरू आहे.

उद्योगपती आणि चित्रपट वितरक अनिल थडाणी आणि रविना पहिल्याच भेटीत एकमेकांच्या प्रेमात पडले होते. पहिल्या भेटीच्या दोन महिन्यांनंतर दोघांनी एकमेकांच्या प्रेमाची कबुली दिली. योग्य जीवनसाथी मिळाल्याची खात्री झाल्याने दोघांनी लग्नाला उशीर केला नाही. विशेष म्हणजे रविनाने लग्नाआधीच दोन मुलींना दत्तक घेऊन आई होण्याचा निर्णय घेतलेला होता. जो व्यक्ती आपल्या मुलींनासुद्धा प्रेम देईल त्याच्याशीच लग्न करेल, असा निर्णय रविनाने घेतलेला होता आणि उद्योगपती अनिल यांनी रविनाच्या निर्णयाचा स्वीकार केला. त्याचबरोबर दोघांच्या लग्नाचा मार्ग मोकळा झाला. लग्नानंतरसुद्धा अनिल रविनाला दिलेले वचन पाळताना दिसत आहे. पतीच्या वाढदिवशी रविनाने केलेल्या एका पोस्टमध्ये पतीचे खूप कौतुक केले. जो तुम्हाला जसेच्या तसे स्वीकारतो असा जोडीदार कुणाला नको असेल. सर्वोत्तम पती, वडील, जावई असे रविनाने पतीचे कौतुक केले आहे. दोघांच्या प्रेमामुळे त्यांचे नाते आजपर्यंत मजबुतीने टिकून आहे.

## मानधनातील तफावतीवरून हुमा कुरेशीचा संताप!

बॉलिवूड अभिनेत्री हुमा कुरेशी नेहमीच चर्चेत असते. सोशल मीडियावरसुद्धा तिचे लाखो चाहते आहेत. सध्या ती तिच्या एका विधानामुळे चर्चेत आली आहे. बॉलिवूडमध्ये अभिनेते आणि अभिनेत्रींना मिळणाऱ्या मानधनात प्रचंड तफावत असते. नायकांइतके मानधन मिळविण्याचा आमचाही अधिकार आहे, आमचीही योग्यता आहे, असे विधान तिने केले आहे.

ज्या चित्रपट आणि वेब सीरिजमध्ये मला सशक्त महिला पात्र साकारायला मिळतात, त्या चित्रपटांचा आणि वेब सीरिजचा एक भाग म्हणून मी स्वतःला भाग्यवान समजते. एक समाज म्हणून आपल्याला सशक्त महिला आवडत नाहीत. आम्हाला अशा स्त्रिया आवडतात ज्या त्यांच्या विचार आणि भावनांबद्दल बोलू शकत नाहीत. हे आपल्या चित्रपटांमध्येही दिसून येते, असे हुमा म्हणाली. मात्र आता काळ बदलत आहे आणि महिला केंद्रित भूमिकांना सुद्धा अधिक मागणी आहे. बॉलीवूडमधील अभिनेत्रींच्या पगारातील तफावतीवर भाष्य करताना हुमा म्हणाली, की पुरुष नायकांना पुरुषकेंद्रित चित्रपट करून स्वतःला सिद्ध करण्याची गरज नाही. मात्र महिलांना स्त्री केंद्रीत चित्रपट करून स्वतःला सिद्ध करावे लागते. बॉलिवूडमध्ये अभिनेत्यांना जेवढे मानधन मिळते तेवढे मानधन मिळविण्याचा आमचाही अधिकार आहे. बॉलिवूडमध्ये अनेक अभिनेत्री स्वतःच्या हिमतीवर चित्रपटाला हिट करत आहेत. त्यामुळे अधिक मानधन मागण्याची आमची योग्यता आहेच, असे हुमा कुरेशी म्हणाली.



**अजय देवगण आणि काजोलच्या लग्नाचा २५ वा वाढदिवस गेल्या आठवड्यात साजरा झाला. पडद्यावर त्यांची जोडी सुपरहिट ठरलीच; मात्र त्याहीपेक्षा पती- पत्नी म्हणून दोघांचे नाते सुपरहिट ठरले, असे म्हणावे लागेल. बॉलिवूडमध्ये एवढे दीर्घकाळ नाते टिकल्याची खूप कमी उदाहरणे आहेत. काजोलने घरच्यांचा विरोध असताना अजयशी लग्न करण्याचा निर्णय घेतला असला तरी आज मात्र तिच्या घरच्यांना देखील तिने घेतलेल्या निर्णयाचा अभिमान वाटतो...**

## प्रेम अन् विश्वासामुळे टिकले अजय-काजोलचे नाते!

काजोल आणि अजयची पहिली भेट झाली ती १९९५ मध्ये हलचल चित्रपटाच्या सेटवर. चित्रपटाच्या शूटिंगसाठी जेव्हा ती तयार झाली तेव्हा चित्रपटात हिरो कोण, असे सर्व जण विचारत होते. तेव्हा कुणीतरी सेटवर कोपऱ्यात बसलेल्या अजयकडे बोट दाखवले. त्यानंतर चित्रपटाच्या सेटवर आमच्यात मैत्री झाली, असे काजोलने सांगितले होते. जेव्हा त्यांची ओळख झाली तेव्हा अजय देवगण दुसऱ्या एका मुलीला डेट करीत होता आणि काजोलसुद्धा तिच्या बॉयफ्रेंडची तक्रार अजयकडे करीत होती. त्यानंतर काजोलचा ब्रेकअप झाला. आम्ही दोघांनी कधीच एकमेकांना प्रपोज केले नाही. मात्र तरीही आम्ही एकत्र असल्याचे आम्हाला वाटायचे, असे काजोलने तिच्या लव्ह स्टोरीबद्दल सांगितले होते. अजयने देखील त्यांच्या पहिल्या भेटीविषयी एका मुलाखतीत सांगितले होते. काजोल सेटवर खूप जोरजोरात बोलायची. त्यामुळे तिला पुन्हा भेटायची इच्छा होत नव्हती. तसे वागणे मला आवडत नव्हते, असे अजय म्हणाला होता.



मात्र त्यानंतर सर्वच बदलले, असे तो म्हणाला. अजय आणि काजोल ४ वर्षे एकमेकांना डेट करत होते. त्यानंतर त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. अजयच्या कुटुंबियांनी लग्नाला परवानगी दिली तरी काजोलच्या वडिलांनी मात्र तिच्यासोबत चार दिवस बोलणे बंद केले होते. काजोलने करिअरकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे तिच्या वडिलांना वाटत होते. मात्र काही दिवसांनी काजोलच्या घरचे कसेबसे तयार झाले आणि २३ फेब्रुवारी १९९९ ला अतिशय साध्या पद्धतीने दोघांचे लग्न पार पडले. त्यानंतर गेली २३ वर्षे त्यांचा सुखाचा संसार सुरू आहे. दोघेही बॉलिवूडमध्ये असताना एवढे दीर्घकाळ नाते टिकणे ही सामान्य गोष्ट नक्कीच नाही. मात्र एकमेकांवरील प्रेम आणि विश्वास यामुळे दोघांचे नाते घट्ट झाल्याचे बॉलिवूडमध्ये बोलले जाते.

## एरिकाला जाड दिसण्यासाठी करावे लागत होते हे काम

एरिका फर्नांडिस सध्या टीव्ही मालिकांमध्ये काम करत आहे. असे असले तरी तिच्या करिअरची सुरुवात तिने मॉडेलिंग आणि दाक्षिणात्य चित्रपटाच्या माध्यमातून केली होती. आतापर्यंत तिने ७- ८ चित्रपटांमध्ये काम केले आहे. मात्र साऊथ इंडस्ट्रीत काम करण्याचा अनुभव अतिशय खराब राहिल्याचे एरिका फर्नांडिसने नुकत्याच एका मुलाखतीत सांगितले. माझ्या शरीरामुळे मला अनेकदा अपमानित केले जात होते, असे तिने मुलाखतीत सांगितले. एरिकाचा शेवटचा दाक्षिणात्य चित्रपट २०१७ मध्ये रिलीज झाला होता. मुलाखतीत तिने सांगितले, की मी तेव्हा खूप बारीक होते. साऊथ चित्रपटाला जशी आवश्यकता होती तशी मी नव्हते, असे चित्रपटाच्या दिग्दर्शकांना वाटत नव्हते. त्यांना चित्रपटात कामुक आणि मादक दिसणे अपेक्षित होते. त्यामुळे जाड दिसण्यासाठी कपड्यांच्या आत मला पॅड घालावे लागत होते. मांड्यावर थाय पॅडपासून तर शरीरावर खुप सारे पॅड बांधावे लागत होते. मी जशी आहे तशी स्वीकारली गेली नाही. शरीराच्या प्रत्येक जागेवर पॅड बांधावे लागले, असे ती म्हणाली.

## ४७ वर्षांची उर्मिला अद्याप का नाही झाली आई?

बॉलीवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीत अभिनेत्री ऊर्मिला मातोडकर यांनी अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केले. आजही त्यांना रंगीला गर्ल म्हणून ओळखलं जातं. कारण हा चित्रपट त्यांच्या करिअरमधील सर्वात मोठा चित्रपट होता. २०१६ मध्ये मोसिन अख्तर यांच्यासोबत लग्न केल्यानंतर उर्मिला यांनी करिअरमधून ब्रेक घेतला. त्यानंतर त्या कोणत्याही चित्रपटात दिसल्या नाहीत. नुकत्याच एका मुलाखतीत त्यांनी फिल्मी करिअरपासून तर व्यक्तिगत आयुष्यापर्यंत अनेक गोष्टींवर खुलासा केला आहे. मातृत्वाबद्दल तुमचे काय मत आहे? आई होण्याचा तुम्ही विचार करत आहात का? किंवा मूल दत्तक घेण्याचा विचार आहे का? असा प्रश्न उर्मिला यांना विचारण्यात आला तेव्हा त्या म्हणाल्या, याचा मी फारसा विचार करीत नाही. जेव्हा जे व्हायचे ते होईल, असे उर्मिला मातोंडकर म्हणाल्या. प्रत्येक स्त्रीने आई असणे आवश्यकच आहे असे नाही. योग्य कारणांसाठी मातृत्व हवे. मला मुलं आवडतात पण जगात अशी अनेक मुलं आहेत, ज्यांना प्रेमाची गरज आहे, असे उर्मिला म्हणाल्या. सिनेसृष्टीला अलविदा करण्याबद्दल उर्मिला यांना विचारण्यात आले तेव्हा त्या म्हणाल्या की, मी अभिनय कारकिर्दीचा त्याग केला नाही. आयुष्यात अनेक टप्पे येतात आणि जातात आणि या सर्व टप्प्यांवर माझा विश्वास आहे. लग्न झाल्यावर मला लग्नाचा आनंद घ्यायचा होता. आयुष्य एका ट्रॅकवर चालवणे मला आवडत नाही. आयुष्याची अनेक रूपे असायला हवीत. मला सर्व काही मोकळेपणाने जगायचे आहे.

## लक्ष्मीकांत बेर्डेंची धाकटी लेकही पडद्यावर



दिवंगत लक्ष्मीकांत बेर्डे मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते होते. आपल्या अभिनयाने त्यांनी मनोरंजन क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली होती. मराठीबरोबरच बॉलीवूड चित्रपटातही त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला होता. आजही त्यांचे चित्रपट प्रेक्षकांना खळखळवून हसवतात. लक्ष्मीकांत बेर्डे यांची पत्नी प्रिया बेर्डे यासुद्धा लोकप्रिय अभिनेत्री आहेत. लक्ष्मीकांत व प्रिया यांना दोन मुलं आहेत. मुलगा अभिनय मनोरंजन विश्वात कार्यरत आहे. आता त्यांची धाकटी मुलगी स्वानंदीही लवकरच अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार आहे.

या अगोदर स्वानंदीने नाटक व एकांकिकेतून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली आहे. आता लवकरच तिचा पहिला चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'मन येड्यागत झालं' असे या चित्रपटाचे नाव आहे. या चित्रपटात स्वानंदीबरोबर अभिनेता सुमेद मुगदलकरची प्रमुख भूमिका आहे, तर अभिनेत्री श्वेता परदेशी सहकलाकाराच्या भूमिकेत झळकणार आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. या ट्रेलरला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळताना दिसत आहे. योगेश जाधव यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून, संदीप पांडुरंग जोशी, कुणाल दिलीप कंदकुर्ते व 'श्री वेद चिंतामणी प्रॉडक्शन' अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. या चित्रपटातील गाण्यांनाही प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. निलेश पतंगे यांनी या गाण्यांना संगीत दिले असून या गाण्यांना जावेद अली, आदर्श शिंदे, हर्षवर्धन वावरे, आनंदी जोशी, निलेश पतंगे यांचा आवाज लाभला आहे. येत्या १ मार्चला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## भुताटकीच्या अनुभवांबद्दल अजय देवगण म्हणाला...



बॉलिवूडचा खरा ॲक्शन स्टार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजय देवगणने आतापर्यंत अनेक सुरपहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. गेल्यावर्षी त्याचे भोला, चाणक्यसारखे चित्रपट प्रदर्शित झाले. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटांनी चांगली कमाई केली होती. आता लवकरच त्याचा 'शैतान' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मध्यंतरी याचा एक छोटासा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आता नुकताच या चित्रपटाचा थरकाप उडवणारा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. काळी जादू, वशीकरण अशा भयानक गोष्टींवर या चित्रपटाचं कथानक बेतलेलं आहे. याच चित्रपटाच्या ट्रेलर लाँच दरम्यान अजय देवगणने त्याला आलेल्या अशाच काही भयानक अनुभवांबद्दल शेअर केलं आहे. अजय म्हणाला, की गेल्या बऱ्याच महिन्यांपासून मला एक हॉरर चित्रपट करायचा होता. याआधी मी 'भूत'सारखा चित्रपट केला आहे. मला हा प्रकार खूप आवडतो. कारण आजही बऱ्याच ठिकाणी काळी जादूसारखी गोष्ट अस्तित्त्वात आहे. अशा अनैसर्गिक घटनांबद्दल बोलताना अजय म्हणाला, की मला असे भुताटकीचे बरेच अनुभव आले आहेत. आम्ही जेव्हा आऊटडोर शुटींगसाठी जायचो तेव्हा हे असे अनुभव आम्हाला बऱ्याचदा आले आहेत. त्यापैकी नेमकं किती खरं किती खोटं हे मला ठाऊक नाही. त्यापैकी काही घटना माझ्या लक्षातही आहेत. पण मी ज्यांना भेटलो आहे त्यांच्यापैकी अशी फार कमी लोक आहेत ज्यांचा या गोष्टीवर अजिबात विश्वास नाही. 'शैतान'मध्ये बॉलिवूडचे दोन दिग्गज अभिनेते अजय देवगण आणि आर. माधवन हे दोघे या प्रथमच एकत्र काम करत आहेत. ट्रेलरमध्ये आर. माधवनचं पात्र हे अजय देवगणवर चांगलंच भारी पडताना दिसत आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन विकास बेहल यांनी केलं आहे. 'शैतान' हा २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या गुजराती चित्रपट 'वश' चित्रपटाचा रिमेक असल्याचे सांगण्यात येत आहे. हा चित्रपट ८ मार्च २०२४ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अजय देवगणबरोबर आर. माधवन, साऊथची सुपरस्टार ज्योतिका यांच्याही प्रमुख भूमिका आहे.

## चिमुकल्या मुलीसाठी शाहिदने सोडलं धूम्रपान!



अभिनेता शाहिद कपूर बॉलीवूड इंडस्ट्रीमधील लोकप्रिय अभिनेता आहे. आपल्या करिअरची सुरुवात नृत्यापासून करणाऱ्या या अभिनेत्याने प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवलं. करिअरच्या या खडतर प्रवासात शाहिदला धूम्रपान करण्याची सवय लागली होती. परंतु, नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत त्याने सांगितलं की, धूम्रपान करणे त्याने कायमचे सोडले आहे आणि त्याचं कारणही तितकंच खास आहे.

अभिनेत्री नेहा धुपियाच्या 'नो फिल्टर नेहा' या चॅट शोमध्ये शाहिदने हजेरी लावली होती. या मुलाखतीत शाहिदने सिगारेट सोडण्यामागचं कारण सांगितलं. तो म्हणाला, की माझ्या मुलीपासून लपून मी धूम्रपान करायचो आणि याच कारणामुळे धूम्रपान सोडण्याचा मी निर्णय घेतला. एके दिवशी जेव्हा मी माझ्या मुलीपासून लपून धूम्रपान करत होतो तेव्हा मी स्वतःला सांगितलं की, हे असं लपून मी कायमच धूम्रपान करू शकणार नाही आणि त्याच दिवशी मी धूम्रपान सोडण्याचा निर्णय घेतला. शाहिद आणि त्याच्या मुलीचं बाँडिंग खूप चांगलं आहे. अनेकदा तो त्याच्या कुटुंबासह माध्यमांसमोर आला आहे. शाहिद कपूर आणि मीरा राजपूत जुलै २०१५ मध्ये विवाहबंधनात अडकले. शाहिद आणि मीराला दोन मुले आहेत, मिशा आणि जैन. मीशा कपूर ही सात वर्षांची आहे, तर जैन हा चार वर्षांचा आहे. दरम्यान, शाहिदच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' हा चित्रपट ९ फेब्रुवारी २०२४ ला प्रदर्शित झाला. या चित्रपटात शाहिद कपूर आणि क्रिती सॅनोनची मुख्य भूमिका आहे. बॉक्स ऑफिसवर चांगली सुरुवात केल्यानंतर, 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया'ने ५० कोटींचा आकडा पार केला आहे. 'देवा' या अगामी चित्रपटात शाहिद कपूर पूजा हेगडेसह झळकणार आहे. हा चित्रपट ऑक्टोबर २०२४ रोजी प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

## शॉर्ट न्यूज

### ९१२ गावांचा कारभार पोलिस पाटलांविनाच

■ **नगर :** महसूल आणि पोलिस प्रशासनाचा दुवा म्हणून गावपातळीवर पोलिस पाटील काम करतात. मात्र, जिल्ह्यातील ९१२ गावांचा कारभार सध्या पोलिस पाटलांविना सुरू असून, विधानसभा निवडणुकीनंतरच गावाला पाटील मिळण्याची शक्यता आहे. जिल्हा प्रशासनाने सात उपविभागीय अधिकाऱ्यांना बिंदु नामावली तयार करून भरती प्रक्रिया करण्याचे निर्देश दिले आहेत. परंतु उपविभागीय कार्यालय अधिकारी सध्या विधानसभा निवडणुकीच्या तयारीत गुंतलेले आहे. त्यामुळे बिंदु नामावली तयार करण्याची प्रक्रिया संथ गतीने सुरू आहे.

### भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप

■ **नेवासा :** येथे गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या असा जय घोष करत भक्तिमय वातावरणात घरगुती गणपती बाप्पा सह गणेश मंडळानी ढोल ताशाचा गजर व लेझीम पथकाचे सदरी करन करून भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप देण्यात आला. मिरवणूक बाघण्यासाठी नेवासा शहरातील मोहिनीराज मंदिरच्या समोरील मुख्य चौकात लहानापासून मोठ्यापर्यंत गणेश भक्तांनी गर्दी केली होती. तर रात्री उशिरा तालुक्यातील सर्व गणेश मंडळाच्या गणरायाचे विसर्जन करण्यात आले आहे. नेवासा पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### मुस्लिम समाजासाठी दीड कोटींचा निधी

■ **श्रीगोंदा :** मुस्लिम समाजाच्या सभागृहासाठी दीड कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यापुढेही शादी खाना कार्यालयासाठी मदत करण्याचे आश्वासन माजी मंत्री, आमदार बबनराव पाचपुते यांनी दिले. श्रीगोंदा शहरातील ईदगाह मैदानावर सभागृहासाठी आमदार बबनराव पाचपुते यांनी दीड कोटी रुपये निधी दिल्याबद्दल त्यांचा तालुक्यातील मुस्लिम समाजाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

### संगमनेर येथे लोकशाही संवादाचे आयोजन

■ **संगमनेर :** मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. देश विकासासाठी व लोकशाहीच्या सुदृढतेसाठी मतदानाचे कर्तव्य प्रत्येकाने बजवावे, असे आवाहन राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले. संगमनेर उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्यावतीने संगमनेर महाविद्यालयात आयोजित लोकशाही संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, संगमनेर उपविभागीय अधिकारी शैलेश हिंगे, उपविभागीय पोलीस अधिकारी हरिष खेडकर, संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य अरूण गायकवाड आदी उपस्थित होते.

### कायदा व सुव्यवस्थेसाठी प्रशासन कटिबद्ध

■ **श्रीरामपूर :** शहरातील तणावाच्या परिस्थितीची जिल्हा प्रशासनाला पूर्ण कल्पना आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी पोलिस प्रशासन काम करत आहे. दोन्ही समाजांनी सामंजस्याची भूमिका घेऊन वातावरण पूर्ववत करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले. मर्चंट असोसिएशन आणि मेमन समाज यांच्या वतीने आयोजित शासकीय विश्रामगृहावरील बैठकीत जिल्हाधिकारी सालीमठ बोलत होते. यावेळी आमदार लहू कानडे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे, आदी उपस्थित होते.

# संत ज्ञानेश्वर सृष्टीचा प्रकल्प आराखडा त्वरित सादर करा

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचना




**नगर : प्रतिनिधी**

**श्री.क्षेत्र नेवासे येथे उभारण्यात येणाऱ्या संत ज्ञानेश्वर सृष्टीचा प्रकल्प आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवीचे स्मारक जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.ज्ञानेश्वर सृष्टीच्या प्रकल्पाचा आराखडा तातडीने तयार करावा, याचे सादरीकरण लवकरच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्या समोर करण्यात येणार असून, अहिल्यादेवी स्मारकाच्या जागेबाबत प्रस्ताव त्वरित सादर करण्याच्या सूचना राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.**

जिल्हाधिकारी कार्यालयात संत ज्ञानेश्वर सृष्टी विकास आराखडा आणि अहिल्यादेवी स्मारका बाबत आयोजित आढावा बैठकीत मंत्री विखे पाटील यांनी ज्ञानेश्वर सृष्टीच्या तयार करण्यात आलेल्या आरखड्याची माहीती जाणून घेतली. बैठकीस जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, संत ज्ञानेश्वर सृष्टीचे काम पर्यावरण बदलात टिकणारे आणि भूकंपरोधक असावे. या सृष्टीच्या भव्यते सोबत भेट देणाऱ्या अध्यात्मिक वातावरणाचा अनुभव येईल अशी रचना असावी. मुख्यमंत्री महोदयांकडे या विकास आराखड्याचे सादरीकरण लवकरच करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नेवासाचे स्थान महात्म्य देशभरात पोहोचविणारे स्मारक असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करतानाच निर्माण होणारे स्मारक राज्यातील वारकरी सांप्रदयाच्या दृष्टीने तसेच जिल्ह्यात येणारे भाविक पर्यटक यांच्यासाठी महत्वपूर्ण ठरेल असे असावे आशी अपेक्षा व्यक्त केली

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक देशातील उत्तम स्मारकांपैकी एक असेल असा आराखडा तयार करावा. स्मारकाच्या ठिकाणी महिला सक्षमीकरण केंद्र असावे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने विविध प्रशिक्षण, अभ्यासक्रम आदींची सुविधा येथे असावी, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी केल्या. यावेळी संत ज्ञानेश्वर सृष्टी आणि अहिल्यादेवी स्मारकाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

**नगर-शिर्डी रस्त्याच्या कामाचा आढावा**

पालकमंत्री विखे पाटील यांनी अहमदनगर-शिर्डी रस्त्याच्या कामाचाही आढावा घेतला. रस्त्याची कामे करतांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ट्रॅफिक वॉर्डन नेमावे. अजूनही खड्डे दुरुस्तीचे काम झालेले नाही, ते त्वरित करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

# सरकार कोसळल्यास काय करणार?

■ एक देश एक निवडणुकीवरून राज ठाकरेंचा सवाल
■ पहिल्यांदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या

**मुंबई : प्रतिनिधी**



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या कॅबिनेट मंत्रिमंडळाने आजच्या बैठकीत एक देश, एक निवडणूक प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या या निर्णयावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी फेसबुकच्या माध्यमातून आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरे म्हणाले की, एक देश, एक निवडणूक हे सर्व ठीक आहे. मात्र आधी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या. तसेच, जर एखाद्या राज्यातील सरकार कोसळल्यास काय करणार? असा सवालही ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.**

**पहिल्यांदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या- ठाकरे**

राज ठाकरे म्हणाले, एक देश एक निवडणूक हे सर्व ठीक आहे, आधी राज्यातल्या महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुका घ्या. येत्या ऑक्टोबर २०२४ मध्ये कित्येक महापालिकांमध्ये, नगरपालिकांमध्ये प्रशासक येऊन ४ वर्ष होतील. इतका काळ नगरसेवक नाहीत म्हणजे लोकप्रतिनिधी नाहीत. ते जास्त महत्वाचं नाही का? स्थानिक स्वराज्य संस्थांचा थेट संबंध सामान्य माणसांच्या जगण्याशी, त्यांच्या प्रश्नांशी असतो. त्याच्याच निवडणुका होत नसतील तर सामान्य माणसाने जायचं कोणाकडे? निवडणुकांचं महत्व इतकंच वाटतंय तर या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर घ्या, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी केंद्र सरकारचे कान टोचले.

ठाकरे म्हणाले,एक देश एक निवडणूक संकल्पनेला आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली. अर्थात ही फक्त केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता आहे आणि अजून याला संसदेची मान्यता लागेल. अर्थात देशातील प्रत्येक राज्याचा कौल पण विचारात घ्यावाच लागेल. या कौलचा अर्थ वरवरची मान्यता नसून अशा प्रकारांनी राज्यांच्या अधिकारांना, स्वायत्ततेला धक्का पोहचणार नाही, याची खातरजमा पण व्हायलाच हवी.

**राज्यातील सरकार बरखास्त झाल्यास...**

ठाकरे पुढे म्हणाले की, जर एखाद्या राज्यातील सरकार कोसळलं किंवा तेथील विधानसभा बरखास्त झाली तर तिकडे आधी निवडणूक होणार का? की त्या राज्याने लोकसभेचा कार्यकाळ संपेपर्यंत वाट पाहायची? किंवा समजा काही कारणांनी लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका लागल्या तर देशातील सगळ्या निवडणुका परत होणार का? असा कुठलाच खुलासा झालेला नाही. तो कदाचित होईल.

# भातकुडगावच्या शाळेच्या परिसरात फुलवली परसबाग !

## भाजीपाल्यामुळे पोषण आहार दर्जेदार

**शेवगाव : प्रतिनिधी**



**तालुक्यातील भातकुडगाव येथील जिल्हा परिषदेच्या केंद्र शाळेत प्रधानमंत्री शालेय पोषण आहार दर्जेदार होण्यासाठी शाळेच्या परिसरातच अनेक पालेभाज्या व फळभाज्यांची उत्कृष्ट परसबाग फुलवली आहे. परसबागेतील ताज्या भाजीपाल्यामुळे शाळेचा पोषण आहार दर्जेदार होण्यास मदत झाल्याने पालकांकडून शिक्षकांचे कौतुक होत आहे.**

गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, शालेय पोषण आहार अधीक्षक शैलजा राऊळ, डॉ. शंकर गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भातकुडगावच्या मुख्याध्यापिका उज्वला गव्हाणे यांनी पालक सभा घेऊन परसबाग तयार करण्याविषयी पालकांचे प्रबोधन केले.भातकुडगाव शाळेत सध्या ९० विद्यार्थी शिक्षण घेतात. प्रगतशील शेतकरी विजय वडणे व बाबासाहेब मनाळ यांनी नांगरणी, सरी व रोटा व इतर कामासाठी ट्रॅक्टर उपलब्ध करून दिला. ऑगस्ट महिन्यात वाफे व सरी काढल्यानंतर त्यात शेपू, मेथी, पालक, कोथिंबीर, भेंडी, दोडका, घोसाळे, मुळा, घोसाळे, चवळी, टॉमेटो, वांगी, गवार, भोपळा, मिरची, कोबी अशा विविध भाज्यांची लागवड करण्यात आली. औषधे व खत दुकानदार संजय वाघमोडे यांनी अनेक बियांची मोफत पाकिटे शाळेस दिली. तसेच विक्रम साळवे व गणेश वडणे यांनी कीड रोगासाठी औषध फवारणी करण्यास मदत केली.

केंद्रप्रमुख नन्नवरे, तसेच मुख्याध्यापिका गव्हाणे यांच्यासह शिक्षिका स्मिता सूर्यवंशी, रमेश बडधे, गोवर्धन तेलुरे यांनीही परसबागेचा उपक्रम यशस्वीतेसाठी सतत परिश्रम घेतले. अखेर सप्टेंबर महिन्यात परसबागेत पालेभाज्या व फळभाज्यांची चांगली वाढ झाली. त्यातील ताज्या चार पालेभाज्या व फळभाज्या रोजच्या शालेय पोषण आहारात वापरण्यात येतात. बाकीच्या भाज्यांची गावात विक्री करून त्यातून जमा होणारे पैसे शाळेच्या विकासकामांसाठी वापरले जातात, असे मुख्याध्यापिका गव्हाणे यांनी सांगितले.

**भाजीविक्रीतून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान**

जिल्हा परिषदेच्या भातकुडगाव केंद्रशाळेतील परसबागेसाठी मुख्याध्यापिका उज्वला गव्हाणे व सर्वच शिक्षकांनी शालेय गुणवत्तेसाठी प्रयत्न करीत असतानाच पालकांचे प्रबोधन करून खूप उत्कृष्ट पालेभाज्या व फळभाज्यांची परसबाग फुलवली आहे. या परसबागेचा पोषण आहार योजनेला फायदा होत आहे. तसेच, इतर भाज्यांची विक्रीने विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाचेही शिक्षण मिळत आहे.

**डॉ. शंकर गाडेकर**
शिक्षण विस्तार अधिकारी

# भाजप विधानसभेच्या १६० जागा लढण्याच्या तयारीत

## ५० उमेदवारांच्या पहिल्या यादीचा मुहूर्तही ठरला



**मुंबई :प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले असून येत्या दहा ते पंधरा दिवसात निवडणूक आयोग यासंबंधी पत्रकार परिषद घेत वेळापत्रकाची घोषणा करण्याची शक्यता आहे. नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात निवडणुका लागण्याचे संकेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. त्यानुसार १० ते २० नोव्हेंबर या काळात निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर भाजप विधानसभेला १६० जागा लढणार असल्याची माहिती मिळत आहे.**

१६० जागांवर भाजप ठाम?

भारतीय जनता पक्षासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेससोबत महायुतीचे जागावाटप अद्याप निश्चित झालेले नाही. परंतु भाजपने १६० हून अधिक जागा लढण्याची तयारी केल्याचे समजते. गेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेसोबत युतीत जितक्या जागा लढल्या, तितक्याच जागा लढण्याच्या मानसिकतेत पक्ष आहे. भाजप नेत्यांमध्ये १६४ जागा लढण्याच्या रणनीतीवर चर्चा झाली आहे. त्यानुसार कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

भाजप १६० हून अधिक जागा लढणार असल्यास शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांच्या वाट्याला मिळून १२५ ते १३० जागा येण्याची शक्यता आहे. यात अन्य घटकपक्षांनाही सामावून घ्यावे लागणार आहेत. अजितदादा ७० जागांवर ठाम आहेत. तर एकनाथ शिंदेही ८० जागांच्या तयारीत आहेत. त्यामुळे जागावाटपावरुन ओढाताण होण्याची शक्यता आहे.

महायुतीत १६८ जागांवर कुठलाही वाद नसल्याचे बोलले जात होते. याचा अर्थ १२० जागांवर रस्सीखेच आहे. भाजप महायुतीत काही जागांची अदलाबदल करू शकतो. म्हणजेच मागच्या वेळी नसलेल्या जागा भाजपला मिळू शकतात, तर मागच्या वेळी लढलेल्या जागा मित्रपक्षांना सोडल्या जाऊ शकतात. उमेदवाराची निवडून येण्याची क्षमता आणि पक्षाची मतदारसंघातील ताकद, या दोन निकषांच्या आधारे जागावाटप आणि उमेदवार निश्चिती केली जाणार आहे. लोकसभा निवडणुकांच्या वेळी उमेदवारांच्या घोषणेत झालेली दिरंगाई आणि अँटी इन्कम्बन्सी लक्षात न घेतल्याने फटका बसल्याचं वरिष्ठ नेत्यांचं मत आहे.

(पान १ वरून)

### काँग्रेसचाच मुख्यमंत्री होणार : आ.थोरात

नेत्यांचे राज्यभरात दौरै सुरु आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून आगामी निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा मुख्य सामना रंगण्याची चिन्ह आहेत. मात्र, असं असलं तरी महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्रिपदावरून उलटसुलट चर्चा सुरु आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची कोकण विभागामध्ये जिल्हा निहाय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत बोलताना बाळासाहेब थोरात यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. याचवेळी बोलताना बाळासाहेब थोरात यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत मोठं विधान केलं. ते म्हणाले, ''येणाऱ्या विधानसभा निवडणुकीतमहाविकास आघाडीम्हणून चांगलं काम करण्याचं आवाहन मी कार्यकर्त्यांना करतो. मला १०० टक्के खात्री आहे की, महाविकास आघाडीचा काँग्रेसचा मुख्यमंत्री होईल. याची खात्री आहे'', असं बाळासाहेब थोरात म्हणाले आहेत.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होतील, असे अनेकदा बोलून दाखवले होते. एवढंच नाही तर आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडे कोणी उमेदवार असेल तर तो त्यांनी सांगावं, असं संजय राऊत यांनी म्हटलं होतं. त्यानंतर शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत कोणीही नसल्याचं एका पत्रकार परिषदेत सांगितलं होतं. दरम्यान, यानंतर आता काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी काँग्रेसचा मुख्यमंत्री होईल, असं विधान केलं आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत मुख्यमंत्रिपदावरून मतभेद असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)

● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरुन पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार

● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार

● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)

पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच



मेजर भगवान नांगरे सर

✽ आमची वैशिष्ट्ये ✽
✽ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✽ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✽ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✽ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✽ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✽ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राउंडची व्यवस्था
✽ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✽ ॲडमिशन ओपन ✽

9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# हॉलीबॉल व बास्केटबॉल स्पर्धेत पारनेर पब्लिक स्कुलचे यश

## जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर येथे पार पडलेल्या बास्केटबॉल स्पर्धेत पारनेर पब्लिक स्कुलच्या मुले व मुलींच्या संघाने तसेच हॉलीबॉल स्पर्धेत मुले व मुलींच्या संघांनी प्रथम क्रमांक पटकावित जिल्हा स्तरीय स्पर्धे साठी आपले स्थान निश्चित केले.**

तालुकास्तरीय १७ वर्षे व १४ वर्षे वयोगटातील स्पर्धा अलिकडे पार पडल्याचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले.

पारनेर पब्लिक स्कुलने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच खेळामध्येही विद्यालयाचे नाव उंचावले आहे. सलग सहा वर्षे हॉलीबॉलच्या संघाने तालुकास्तरीय विजयाची परंपरा कायम राखतानाच यंदा बास्केटबॉल स्पर्धेतही विद्यालयाच्या संघाने यश संपादन केले आहे.



पारनेर पब्लिक स्कुलच्या संघांनी हॉलीबॉल व बास्केटबॉल स्पर्धेत तालुकास्तरावर यश संपादन केले.

### १४ वर्षे बास्केटबॉल मुलांचा संघ

सार्थक कावरे, समर्थ पतके, आदित्य ठुबे, श्रीराज पठारे, सुरज चेडे, आदित्य मगर, कृष्णा भगत, यश वरखडे, विश्वेश मांढरे, ब्रम्हेश मांढरे, सुशांत कावरे, वेदांत कानवडे.

### १४ वर्षे बास्केटबॉल मुली

सिध्दी गोळे, अनुष्का मापारी, सेजल शेटे, तनिष्क अडसूळ, शरयु गट, श्रेकया पायमोडे, संस्कृती रासकर, साक्षी बुरोगोणी, मानसी काळे, जिया तांबोळी, वैष्णवी कोल्हे

### १४ वर्षे व्हॉलीबॉल मुली

स्पंदन भोर, राजीव इघे, गायत्री औटी, काव्य शिंगवी, संस्कृती उदावंत, पारायणी बेलोटे, श्रेया चत्तर, नव्या दुधाडे, नुरैन राजे, ज्ञानेश्वरी ठुबे, आसावरी चत्तर, श्रृतिका रेपाळे. यश वरखडे, विश्वेश मांढरे, ब्रम्हेश मांढरे, सुशांत कावरे, वेदांत कानवडे.

### ७ वर्षे हॉलीबॉल मुले

यश गुंड, आर्यन सुर्यवंशी, आय्रन चौधरी, संस्कृती ठुबे, सुमित गुंजाळ, तन्मय गाडगे, प्रज्वल मोरे, धनराज पठारे, अर्थव वाघमारे, साईराज क्षिरसागर, तेजस चत्तर, हर्षवर्धन खोडदे.

### १७ वर्षे व्हॉलीबॉल मुली

विद्या रावडे, ऋतिका ऋतिका चौधरी, प्रांजल गाडे, समृध्दी मंडलीक, अनुष्का विश्वनाथ चौधरी, अनुष्का अविनाश चौधरी, वैष्णवी भालेकर, तन्वी औटी, शर्वरी थोरात, पुजा पवार, सृष्टी पवळे, श्रुती पठारे. विजयी खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक महेश जाधव,दीपक जाधव, महेश चासकर यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# जय भवानीचा आदर्श इतर मंडळांनी घ्यावा

## राणीताई लंके यांचे आवाहन

पारनेर : प्रतिनिधी

**गणेश विसर्जन मिरवणूकीमध्ये गुलाल, कर्णकर्कश डीजे आदींना फाटा देउन शिस्तबध्द मिरवणूकीची परंपरा पारनेर शहरातील जय भवानी मित्र मंडळ जपत असून या मंडळाचा आदर्श तालुक्यातील इतर मंडळांनीही घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके यांनी केले.**

पारनेर शहरातील जय भवानी मित्र मंडळाच्या गणपती विसर्जन मिरवणूकीस लंके यांच्या हस्ते आरती करून प्रारंभ करण्यात आला, त्यावेळी त्यांनी मंडळाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत संवाद साधला.

यावेळी बोलताना लंके म्हणाल्या, भारतीय स्वातंत्र्याच्या लढा बळकट करण्यासाठी लोकांनी एकत्र यावे या उदात्त हेतूने लोकमान्य टिळकांनी



सार्वजनिक गणेशोत्सवास सुरूवात केली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतीक, बौध्दीक कार्यक्रमांच्या माध्यमातून गेली दहा दिवस जनजागृती होते. आपली संस्कृती, देशाबाबत नव्या पिढीमध्ये अस्मिता निर्माण व्हावी हा देखील गणेशोत्सवामागील हेतू असल्याचे लंके म्हणाल्या.

समाज जागृतीसाठी सुरू करण्यात आलेल्या गणेशोत्सवाचे स्वरूप गेल्या काही दिवसांमध्ये बदलल्याचे चित्र असून जय भवानी मित्र मंडळाने मात्र त्यास छेद देत विविध मंडळांपुढे आदर्श निर्माण केल्याचे गौरवोद्गार लंके यांनी काढले. लंके यांच्या हस्ते आरती झाल्यानंतर हलगीच्या तालामध्ये विसर्जन मिरवणूकीस दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास सुरूवात होऊन दुपारी दिड वाजण्याच्या सुमारास गणपतीचे विसर्जन करण्यात आले. मिरवणूकीमध्ये भगव्या टोप्या परीधान केलेले मंडळाचे सदस्य सहभागी झाले होते. अतिशय शिस्तबध्द पध्दतीने काढण्यात आलेल्या या मिरवणूकीचे पारनेकरांनी कौतुक करीत अनेक जण या मिरवणूकीमध्ये सहभागी झाले होते.

# अपधूपमध्ये टाळ मृदुंगाच्या गजरात गणपतीचे विसर्जन

## डिजेच्या दणदणाटाला दिला फाटा

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील आपधूप येथे मंगळवार दि.१६ रोजी मोठ्या भक्तिभावाने सामुदायिक गणेश विसर्जन करून गणपती बाप्पाला निरोप देण्यात आला.**

चालू वर्षी खरीप हंगामात पावसाने जोरदार हजेरी लावली असल्याने ओढे, नाले, केटीवेअर, तळे, विहिरी पूर्ण क्षमतेने भरलेल्या आहेत. पाऊस पाणी भरपूर असल्याने तालुक्यात या वर्षी गणपती बाप्पाचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. दहा दिवस विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.आपधूपमध्ये



सार्वजनिक गणेशोत्सवादरम्यान विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यादरम्यान गावातील मुलांनी सहभाग नोंदविला. ग्रामस्थांनी हिरीरीने सहभागी होत गणेश उत्सवात रंगत वाढवली.

गणेश उत्सव व विसर्जन मुरवणुक म्हटले की, डिजेचा दणदणाट ऐकू येतो, डिजेवर लाखो रुपये खर्च केले जातात, मिरवणुकीत डिजे लावून तरूण मंडळी त्यावर थिरकताना दिसतात मात्र आपधूपमध्ये या सर्व गोष्टींना फाटा देत गणेश विसर्जन मिरवणूक टाळ मृदुंगाच्या गजरात काढण्यात आली. भविष्यात इतर गावांतील मंडळ व सार्वजनिक गणेश उत्सव मंडळासाठी ही मिरवणूक प्रेरणादायी ठरणार आहे.

# स्व.बाबाशेठ कवाद यांनी शैक्षणिक संस्कृतीला चालना दिली

## माजी सरपंच लताताई कवाद यांचे प्रतिपादन



विविध क्षेत्रात पुरस्कार मिळविलेल्या गुणवंतांचा बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्था यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

निघोज : प्रतिनिधी

**निघोज व परिसरातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून शैक्षणिक दर्जा उंचावला तर या भागातील विद्यार्थी स्पर्धा परिक्षेत उत्तीर्ण होऊन त्यांना उच्चस्तरीय अधिकारी होता येईल हा दूरदृष्टीकोण ठेऊन निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष स्व. बाबाशेठ कवाद यांनी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना करीत या भागात महाविद्यालयीन उच्च शिक्षणासाठी प्रयत्नशील राहात शैक्षणिक संस्कृतीला चालना देण्याचे काम केल्याने गुणवंताचे निघोज म्हणून हा परिसर नावलौकिककास पात्र ठरला असल्याचे प्रतिपादन निघोज गावच्या माजी सरपंच लताताई कवाद यांनी व्यक्त केले आहे.**

निघोज आणि परिसरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या गुणवंतांचा बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्था व निघोज ग्रामीण संस्था परिवार यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यामध्ये बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल या शाळेला उत्कृष्ट शाळा म्हणून पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष शांताराम कळसकर, उपाध्यक्ष प्रकाश कवाद, सचिव वसंत कवाद सर, व्यवस्थापिका संगीता कवाद, प्राचार्य डायस सर यांचा माजी सरपंच ठकारामशेठ लंके, निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत लामखडे, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, माजी चेअरमन रामदासशेठ वरखडे, पारनेर तालुका वकील संघटनेचे मुख्य पदाधिकारी ॲड. सुनिल मेसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

निघोज येथील वात्सल्य हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनिल विष्णू कदम यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कपिलेश्वर उद्योग समूहाचे सर्वेसर्वा सोमनाथ वरखडे, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके, प्रसिद्ध वास्तुविशारद वसंतराव वांढेकर, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, पतसंस्थेचे वरिष्ठ अधिकारी सुनील तांबे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल राजश्री वारे मॅडम यांचा माजी सरपंच लताताई कवाद, ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद, न्यू इंग्लिश स्कूलच्या व्यवस्थापिका संगीता कवाद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय कराटे स्पर्धेत चंदेरी पदक मिळाल्याबद्दल विहा गणेश लामखडे या विद्यार्थीनीचा बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, पतसंस्थेचे जनरल मॅनेजर संपतराव ठुबे, संचालक सतिष साळवे, उपव्यवस्थापक शांताराम सुरकुंडे, वरिष्ठ अधिकारी सत्यवान गुंड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्कारमूर्तींनी यावेळी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले प्रत्येक क्षेत्रात सेवाभावी काम करण्याची संधी आहे. फक्त त्या संधीचे सोने करण्याची गरज आहे. क्रिडा,शिक्षण वैद्यकीय ही सेवाभावी काम करण्याची एक सेवाभावी साधणे आहेत. निघोज ग्रामीण संस्था परिवार आणि पतसंस्था चळळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक आणिसंस्थापक अध्यक्ष स्व. बाबासाहेब कवाद यांनी समाजसेवेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. त्यांचे अनुकरण करीत आम्ही विविध क्षेत्रात पुरस्कार मिळविला हा आमचा आनंद आज संस्थांच्या माध्यमातून सत्कार माध्यमातून साजरा होत आहे ही गौरवशाली परंपरा जपण्याचे काम होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सत्कारमूर्तींनी व्यक्त केले आहे.

# विद्याधामच्या खेळाडूंनी गाजविले मैदान! ४३ बक्षिसांची कमाई

## १९ खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड

सुपा : प्रतिनिधी

**श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील खेळाडूंनी तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत ४३ बक्षीसे पटकावत मैदान गाजवले तर १९ खेळाडूंची ३५ क्रीडाप्रकारात जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**१४ वर्ष वयोगट**

अथर्व बोबडे - ६०० मी. प्रथम, ८० मी. अडथळा प्रथम, करण ठाणगे - लांब उडी - प्रथम, २०० मी. -द्वितीय, साई खोले - गोळा फेक - प्रथम, पायल लामखडे - लांब उडी -प्रथम, ६०० मी. तृतीय, तेजस्विनी ताम्हाणे - लांब उडी - द्वितीय, वैष्णवी वाखारे - ८० मी अडथळा -द्वितीय, सायली शेळके - गोळा फेक - तृतीय

**१७ वर्ष वयोगट**

शुभम पवार - १५०० मी - प्रथम, ३००० मीटर प्रथम, ४०० मी अडथळा - प्रथम, रुद्र लोखंडे - लांब उडी - प्रथम, तिहेरी उडी - प्रथम, ४०० मी अडथळा - द्वितीय, अथर्व ढवळे - लांब उडी - तृतीय, तिहेरी



उडी - द्वितीय, ओम यादव - ११० मी अडथळा - प्रथम, समिक्षा वाळुंज - लांब उडी - प्रथम, तिहेरी उडी - प्रथम, १०० मी अडथळा - प्रथम, साक्षी बनकर - ४०० मी अडथळा - द्वितीय, गोळा फेक - तृतीय.

**१९ वर्ष वयोगट**

प्रतिक भालेकर - लांब उडी -प्रथम, ११० मी अडथळा - तृतीय, रोहन यादव - तिहेरी उडी - प्रथम, आदित्य गुंजाळ -क्रॉसकंट्री - तृतीय क्रमांक, वैभव कोकाटे -क्रॉसकंट्री - चौथा क्रमांक, प्राजक्ता पवार- लांब उडी -प्रथम, तिहेरी उडी - प्रथम , ४०० मी अडथळा - प्रथम, श्रृती खोले- तिहेरी उडी - द्वितीय, ४०० मीटर, २०० मी-द्वितीय, श्रेया पठारे -११० मी . अडथळा -प्रथम, साक्षी जाधव - लांब उडी - तृती ,प्राजक्ता मोहळकर - गोळा फेक -तृतीय आदी विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक संदीप घावटे, अमोल कातोरे, सतीश झांबरे, सतीश कौठाळे, लक्ष्मण आयरे, सोनाली शेळके, कांता मांडगे, वंदना गायकवाड, सुजाता पठारे यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्वांचे शिरूर शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम सर, शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, मुख्याध्यापक विशाल डोके, पर्यवेक्षक नामदेव डुंबरे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बुध्दीबळ स्पधेत किसानच्या विद्यार्थ्यांची बाजी !

## जिल्हास्तरीय स्पर्धेत तालुक्याचे नेतृत्व करणार

पारनेर : प्रतिनिधी

**नगरचे जिल्हा क्रीडा कार्यालय व पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या बुध्दीबळ स्पर्धेत पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांची बाजी मारली. विद्यालयाचे खेळाडू शिर्डी येथे पार पडणाऱ्या जिल्हा स्तरीय स्पर्धेत तालुक्याचे नेतृत्व करणार आहेत.**

तालुकास्तरावर पार पडलेल्या या स्पर्धेत १४ ,१७ व १९ वर्षे वयोगटातील विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभागी झाले होते. किसान संस्थेच्या विद्यार्थ्यांनीही या स्पर्धेत सहभाग नोंदविला. या स्पर्धेत शरयू एरंडे, स्वरा कावरे, विशाखा झंजाड, तनय भोर, तन्मय औटी यांनी चांगली कामगिरी बजावली. प्रथम, व्दितीय क्रमांक पटकावित जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे किसान बहुउददेशिय संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी सन्मानचिन्ह देऊन कौतुक केले. यावेळी बोलताना चेडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच खेळांनाही महत्व दिले पाहिजे. शारीरीक स्वास्थ्यासाठी खेळाला




बुध्दीबळ स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे चंद्रकांत चेडे यांनी सन्मानचिन्ह देऊन कौतुक केले.

अनन्यसाधारण महत्व असून विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये आवर्जुन सहभागी व्हावे. बुध्दीबळासारख्या खेळामध्ये प्राविण्य मिळविणे हे कौतुकास्पद असून त्यातून बुध्दीला चालना मिळते. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही चेडे यांनी अभिनंदन केले.

किसानचे प्राचार्य राठोर, पारनेर तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष बापूसाहेब होळकर, उद्योजक ऋषिकेश चेडे, क्रीडा शिक्षक ऋषिकेश औटी यांच्यासह सर्व शिक्षकांनीही विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### सर्वांगिण विकासाचे ध्येय

**आमच्या विद्यालयाचा विद्यार्थी केवळ अभ्यासातच निपुन व्हावा असे नाही तर तो सर्वगुणसंपन्न असावा यासाठी विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांच्या तयारीबरोबरच विद्याथी शारीरीक, मानसिकदृष्टया तंदुरूस्त रहावा यासाठी विविध खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यालयाच्या वतीने प्रोत्साहन देण्यात येते.**

**चंद्रकांत चेडे**

**अध्यक्ष, किसान बहुउद्देशिय संस्था, पारनेर**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com